दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १०७ वा रविवार दि.२९ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# माझं लातूर परिवाराच्या अनोख्या आंदोलनाने लातूरकरांचे लक्ष वेधले

## मंत्रिमंडळाचे मुखवटे घालून जिल्हा रुग्णालयासाठी भीक मागून केला निधी जमा

लातूर : लातूर जिल्हा रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी आग्रही मागणी करीत माझं लातूर परिवाराने चक्क मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडामंत्री संजय बनसोडे यांचे मुखवटे घालत भीक मागून निधी गोळा केला. या अनोख्या प्रतीकात्मक आंदोलनाने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. शहरातील गांधी चौक येथून सकाळी १०.३० च्या सुमारास या प्रतीकात्मक भीक मागो आंदोलनास सुरुवात झाली. माझं लातूर परिवारातील सदस्यांनी यावेळी मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे मुखवटे घातलेले होते. जिल्हा रुग्णालय झालेच पाहिजे अशा घोषणा देत व्यापारी, सर्वसामान्य नागरिक यांच्याकडून जिल्हा रुग्णालयासाठी भीक मागण्यात आली. गांधी चौक, बसस्थानक, हनुमान चौक ते गोलाई पर्यंत हे आंदोलन करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून मंजूर असूनही प्रलंबित असलेला लातूर





जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ पासून शासनदरबारी पाठपुरावा करण्यास सुरुवात केली होती. बेमुदत साखळी उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले. चक्क मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, पालकमंत्री यांना साकडे घातले. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी विनंती केली होती. अखेर १९ जून २०२४ रोजी राज्य सरकारने आदेश काढून कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग करून ताब्यात घ्यावी असे निर्देश दिले. विशेष म्हणजे ही प्रक्रिया ६० दिवसात पुर्ण करावी असा स्पष्ट उल्लेख शासन आदेशात करण्यात आला. मात्र दुर्दैवाने ही मुदत संपून १ महिना उलटून गेला आहे. या संपूर्ण विषयाची सविस्तर माहिती वेळोवेळी पालकमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने प्रत्यक्ष भेटून, निवेदन सादर करून आणि ईमेल द्वारे देण्यात आली आहे. शासनाकडे लातूर जिल्हा रुग्णालयासाठी ३ कोटी निधी उपलब्ध नाही का? म्हणून २८ सप्टेंबर २०२४ रोजी शहरात प्रतीकात्मक मुखवटे घालून निधी गोळा करण्यात आला. उद्या २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जिल्ह्यातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधींचे मुखवटे घालून निधी जमा करण्यात येणार आहे. जिल्हा रुग्णालयाच्या या आंदोलनात लातूरच्या सर्व सुजाण नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. आजच्या आंदोलनात परिवारातील पत्रकार, संपादक, समाजसेवक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

## क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या भेटीनंतर उपोषणकर्ते विजयकुमार घाडगे पाटील यांनी घेतले औषधोपचार

लातूर : – औसा तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसलेले विजयकुमार घाडगे पाटील यांची क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज औसा येथे उपोषणस्थळी जावून भेट घेतली. तसेच त्यांना सोयाबीन दरवाढीबाबत राज्य शासनाच्या भूमिकेची माहिती देवून उपोषण मागे घेण्याची विनंती केली. उपोषण मागे घेण्याबाबत दोन दिवसात निर्णय घेणार असल्याचे सांगून औषधोपचार करून घेण्यास श्री. घाडगे पाटील यांनी यावेळी सहमती दर्शविली. त्यानुसार त्यांच्यावर औषधोपचार सुरु करण्यात आले. औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, तहसीलदार घनश्याम अडसूळ यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. ना. बनसोडे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनला जास्तीत



जास्त दर मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. केंद्र शासनानेही खाद्यतेलावर आयात शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला असल्याने सोयाबीनच्या दारात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानुसार श्री. घाडगे पाटील यांनी औषधोपचार करून घेण्यास सहमती दर्शविल्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत. आमदार श्री. पवार यांनीही यावेळी श्री. घाडगे पाटील यांना सोयाबीन दरवाढीबाबतच्या धोरणांची माहिती देवून सोयाबीनला चांगला दर देण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे सांगितले.

## जुने पाईप टाकून पुलाचे काम चालू प्रशासनाचे दुर्लक्ष; ५ वर्षापासून काम रखडले, कोठारी ते हिमायतनगर रस्त्याचे काम निकृष्ट

पाच वर्षा पासून सुरू असलेल्या कोठारी ते हिमायतनगर पर्यंत च्या राज्य मार्ग १६१ (अ) चे काम सुरू असून ते अतिशय निकृष्ठ दजार्चे झाले आहे. यामागारील काही ठिकानी नळकांडी पुलाचे काम चालु असून त्या नविन पुलाच्या बांधकामात अक्षरशा फुटलेल्या जुन्या नळ्या टाकूण पूल तयार करून बोगस कामाची सिमाच ओलांडली आहे. असा बोगस काम करणारा गुतेदार भेटणे आणि बोगस काम रोखण्यासाठी लोक प्रतिनिधी, प्रशासकिय अधिकारी किंवा कोणत्याही पक्षाचा पदाधिकारी न कार्यकर्ता मिळणे म्हणजे किनवट तालुक्याच्या जनतेचे दुर्भागेच म्हणावे लागेल. आम नागरिकांनी अनेक वेळेस तक्रार दिली पण किनवट तालुका आदिवासी असल्यामुळे प्रशासनाने लक्षच दिले नाही सामान्य माणसाकडून असे ऐकायला मिळत आहे.

किनवट/शेख शौकत :–किनवट तालुकयाची महाराष्ट्रात आतिशय दुर्गम, मागास व डोंगरी किनवट तालुका म्हणून ओळख. जिल्हाच्या ठिकाणा पासून जवळपास २०० किमीटर अंतर आहे किनवट ते नांदेड रोड ची अनेक वर्षा पासून दैयनिय अवस्था होती. किनवट तालुक्यातील कॉग्रेस, भाजप, रिपाई, राष्ट्रवादी पक्षाचे आमदार झाले, किनवट विधानसभेचे मंत्री ही झाले. परंतू नांदेड ते किनवट हा रोड टकाटक कधीच झाला नाही म्हणूनच दुर्गम मागसलेला तालुका म्हणून महाराष्ट्रात ओळख असावी आसे वाटते. पाच सहा वषापूर्वी नांदेड किनवट रोड राज्य महामार्ग १६१ (अ) चार पदरी होणार सहा पदरी होणार अशी चर्चा सुरू झाली. सिमेंट कॉक्रेट चा रोड मंजुर झाला तेंव्हा किनवट कराचा आनंद गगनात मावेनासी झाला किनवट कर विचार करू लागले बोधडी घाट व धानोरा घाट इतर घाट असलेले फोड्न चड कमी केला जाईल जिथे वळण जास्त तीथे रोड सरळ केला जाईल संपूर्ण रोड सिमेंट कॉक्रेट चा चकाचक रोड होईल आणि नांदेडला दोन ते अडीच तासात जाता येईल रोड टाकणे असे होते. इतर अनेक ठिकाणी रोड न फोडताच पक्का असे स्वप्न किनवटची जनता पहात होती. कामाचे टेंडर निघाले भोकर ते हिमायतनगर व कोठारी ते माहूर मोरगे गुतेदारास काम मिळाले त्यांचे दोन ही कामे चांगले आणी वेळेत पूर्ण झाले. परंतू हिमायतनगर ते कोठारी चे काम दुसऱ्या गुतेदाराला मिळाले पण काम करणार यंत्रणा जुनीच असल्यामुळे



सुरू होवून पाच वर्षे झाली. आजून काम पुर्ण झाले नाही झालेल काम व सध्या चालु असलेले काम अतिशय निकृष्ठ होत आहे. रोडचे काम करताना पहिला रोड उकरून पका मुरूम त्यावर गीटी त्यावर कॉक्रीट नंतर मशिनने कॉक्रीट मुरून न टाकता काळी माती टाकली मातीचे परिणाम दिसून आले जागोजागी भेगा झाले रोडावर, प्रत्येक पुलाजववळ सोडलेले काम मशिनने न करता हाताने काम केले कॉन्ट्रॅक्टदार आणि मनमानी करून काम चालूच ठेवले . बोधडी ते थारा मधील पुलाचे काम सुरू करून वर्षे लोटले त्या ठिकाणी अनेक अपघात होवून अनेक जन अपंग व दुर्घटना झाले आशा अनेक ठिकाणच्या बोगस कामाची प्रशासना कडे अनेकांनी तक्रारी केल्या परंतू प्रशासनाने दखल घेतली नाही त्यांनी कोणाला ही न जुमानता संपूर्ण काम बोगस केले इथेच नाही तर सर्व हिमायतनगर ते कोठारी पर्यंत चा रोडचे अतिशय बोगस काम केले अनेकानी तक्रारी केल्या खऱ्या पण त्याचे कामा चालु असलेले बोगस काम कोणीच रोखू शकले नाही किनवट तालुक्याचे नशीब. ही किनवट वाशियांसाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.

# विलास को-ऑपरेटिव्ह बँकेने स्थापनेपासून बेरोजगार युवक, व्यापारी,

## उद्योजक व शेतीपूरक व्यवसायिक सभासदांची आर्थिक उन्नती साधण्याच्या

लातूर / प्रतिनिधी :– लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील सहकारी बँकांच्या क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या विलास को–ऑपरेटिव्ह बँकेने स्थापनेपासून आजपर्यंत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या बेरोजगार युवक, व्यापारी, उद्योजक व शेतीपूरक व्यवसायिक सभासदांची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने बँकेने धोरण राबविले असे बॅकेचे अध्यक्ष ड. किरण जाधव म्हणाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूरचे माजी पालकमंत्री तथा विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे संस्थापक अध्यक्ष आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली विलास को –ऑपरेटीव्ह बँकेची २३ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आज शनिवार दि. २३ सप्टेंबर रोजी दुपारी लातूर शहरातील विष्णुदास मंगल कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष समद पटेल संचालक सर्वश्री अनिल शिंदे, व्यंकटेश पुरी, अरुण कामदार, अजय शहा, डॉ.कल्याण बरमदे, सलीम तज्ञमुलहुसेन उस्ताद, प्रा.डॉ.जयदेवी पांडुरंग कोळगे, चंद्रकांत धायगुडे, रमेश थोरमोठे (पाटील), पंडित कावळे, सीए ऋषिकेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र सपाटे, गणेश देशमुख, महादेव मुळे, अनंत बारबोले, फारुख शेख, प्रा.प्रवीण कांबळे, जितेंद्र स्वामी, सुलेखा कारेपूरकर आदीसह विलास बँकेचे सर्व कर्मचारी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवातिला





लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. विलास को–ऑपरेटिव बँकेचे अध्यक्ष किरण जाधव म्हणाले की, लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील सहकारी बँकांच्या क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या विलास को–ऑपरेटिव्ह बँकेच्या कामकाजाचा शुभारंभ २००३ झाला. बँकेने स्थापनेपासून आजपर्यंत बेरोजगार युवक, व्यापारी, उद्योजक व शेतीपूरक व्यवसायिक सभासदांची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने बँकेने धोरण राबविले. लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांचे विचार आणि सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची प्रेरणा व बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली बँकेची गेल्या २३ वर्षांची वाटचाल इतर को–ऑपरेटिव बँकांसाठी पथदर्शी राहिलेली आहे. बँकेच्या स्थापनेपासूनच बँकेचे कामकाज पारदर्शक राहिले आहे त्यामुळे आतापर्यंत बँकेस ऑडिट वर्ग अ मिळालेला आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, बँक उभारणीपासूनच बँकेची प्रगती नियोजनपूर्वक करण्यात आली ती केवळ सभासद बेरोजगार युवक व्यापारी उद्योजक व शेतीपूरक व्यवसाय यांच्या विकासासाठीच बँकेच्या सर्व शाखांमध्ये उत्कृष्ट सेवा दिली जात आहे बदलत्या काळानुसार विलास बँकेने बँकिंग सेवेतील बदल स्वीकारले आहेत सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिकता आणली आहे ग्राहकांना तत्पर सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत सभासद व भाग भांडवल, राखीव व इतर निधी, ठेवी, ठेवीवरील विमा, कर्ज, अग्रक्रम व दुर्बल घटकांना दिलेले कर्जे, गुंतवणूक,कर्ज वसुली/एनपीए, ऑडिट वर्ग,नफा विभागणी आदी विविध विषयाची सविस्तर माहिती बँकेचे अध्यक्ष किरण जाधव यांनी उपस्थिताना दिली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर म्हणाले की, विलास को–ऑपरेटिव्ह बँक ही अतिशय चांगली चालते आहे सध्या बँकेचे डिपॉझिट वाढणे हे नागरी बँका पुढील मोठे आव्हान आहे, संचालकांना स्वतःच्या बँकेतून कर्ज घेता येत नाही. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या कर्तृत्वामुळेच बँकेचे डिपॉझिट वाढले आहे, या बँकेला २३ वर्षे झाले म्हणजे ही बँक आता तरुण झाली आहे. केंद्र सरकारला मात्र सहकार बंद करायचा आहे, त्यामुले सहकारी बँक चालवणे आता अवघड होत आहे. पूर्वी २१९४ बँक होत्या ६७० बँक आज बंद झाल्या आहेत जास्त गुजरातमधील बँका बंद झाल्या आहेत. सहकार सर्वसामान्य गोरगरीब लोकांच्या मदतीला धावून जातो लोकनेते विलासराव देशमुख माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात सहकार उभारला गेला असे सांगून त्यांनी विलास को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र सपाटे यांनी बँकेच्या २३ व्या आधीमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभे पुढील विविध विषयाच वाचन केले त्या सर्व विषयाला सभासदांनी टाळ्याच्या गजरात अनुमती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लातूर जिल्हा कॉंग्रेस सोशल मीडियाचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांनी केले तर शेवटी आभार विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांनी मानले

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# प्राणाशी गाठ

केंद्रीय औषध नियंत्रण संघटना अर्थात 'सीडीएससीओ'ने त्यांच्या अहवालात धक्कादायक माहिती दिली आहे. देशात वापरात असलेली ५० पेक्षा अधिक औषधे मानक दर्जाची नसल्याची त्यांनी घोषित केले आहे. ही औषधे त्यांनी गुणवत्ता आणि सुरक्षेच्या अनुषंगाने घेतलेल्या चाचणीत अपयशी ठरली आहेत. पॅरासिटामॉल, पॅन डी आणि कॅल्शियम सप्लिमेंट्ससह जी इतर औषधे आपल्याकडे अगदी सहजपणे घेतली जातात अथवा उपलब्ध होतात त्यात त्रुटी आढळून आली आहे. त्यावरून एकच बाब स्पष्ट होते की औषधांचे सेवन करणेही आता धोक्याचे बनले आहे. त्यातून प्रसंगी प्राणाशी गाठ पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. रुग्णाचा मग तो अगदी साध्या तापाचा रुग्ण असो अथवा दुर्धर आजाराने ग्रस्त असलेला रुग्ण असो पहिला विश्वास डॉक्टरांवर असतो. डॉक्टरांचा शब्द त्याला मोठा मानसिक आधार असतो. बर्याच रुग्णांचे ५० ते ८० टक्के आजारपण त्यातून बरे होते. उर्वरित काम त्यांनी दिलेली औषधे करतात. काही औषधे अशीही असतात की डॉक्टरांचा सल्ला न घेताच पूर्वानुभवावरून घेतली जातात. घरातली एखादी ज्येष्ठ व्यक्ती किंवा सहकारी अथवा मित्र त्यांच्या अनुभवावरून एखाद्या गोळीचे अथवा सीरपचे नाव सुचवतात आणि ते औषध घेतले जाते. सामान्य पोटदुखी, सर्दी, खोकला अथवा कणकण जाणवणे यावेळी लोक असे प्रयोग करतात. बहुतेक वेळा ओळखीच्या औषधालयातून त्या विक्रेत्याच्या सल्ल्यानेही ती घेतली जातात. हे सर्रास झाले आहे. असे सगळे कथितपणे सुखेनैव सुरू असताना जर ५० पेक्षा अधिक औषधे चाचणीत अपयशी ठरल्याची बातमी येत असेल तर स्थिती गंभीर आहे. बरे ज्या औषधांची नावे समोर आली आहेत त्यातील काही सामान्य ॲसिडीटी अथवा तापासाठी घेतली जातात. ती इतकी परिचित नावे आहेत की बहुतांश वेळा डॉक्टरांना न विचारताच मनानेच घेतली जातात. याचा अर्थ जी औषधे आजारावरील उपचार म्हणून घेतली जात असल्याचा दावा केला जात होता, तीच औषधे अन्य कोणत्या धोक्याची वाहक होती का? तशी जर ती होती, जे आता सिद्ध झाले आहे, मग विकली कशी जात होती? गेल्या महिन्यातही दीडशे औषधांवर बंदी घातली गेली. त्यात प्रामुख्याने प्रतिजैविके अर्थात अँटीबायोटीक्स, मल्टीव्हिटॅमिन, वेदनाशामक म्हणजे पेनकिलर आणि सर्दी तापासाठी घेतल्या जाणार्या औषधांचा समावेश होता. या औषधांचे सेवन आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे त्यावेळी सांगितले गेले. गेल्या वर्षी आफ्रिकेतील एका देशात खोकल्याच्या एका औषधाबाबत धक्कादायक बातमी आली होती. भारतात एका ज्येष्ठ उद्योगपतीने त्यांच्या क्षेत्राशी संबंध नसलेल्या या बातमीकडे एका कार्यक्रमात लक्ष वेधले होते. संबंधित औषधामुळे त्या देशात ७८ लहान मुलांच्या मूत्रपिंडाला धोका निर्माण झाला होता. यातील ६६ दुर्दैवी बालकांचा त्यामुळेच मृत्यू झाला. यातील बहुतांश मुले दोन वर्षांपेक्षा कमी वयाची होती. तेथील आरोग्य अधिकार्यांना त्यांच्या तपासणीत एका बाबीची शंका आल्यावर त्यांनी तातडीने दोन औषधांचा वापर थांबवण्याचे निर्देश दिले होते. विशेष म्हणजे त्यात पॅरासिटामॉलचा आणि एका सीरपचा समावेश होता. जी भारततही दिली जातात आणि साधारण त्याच वयोगटातल्या मुलांसाठी ती वापरली जातात. त्यावेळी करण्यात आलेल्या तपासात ही औषधे भारतातील एका कंपनीकडून आयात केली गेल्याचे आढळून आले होते. या कंपनीच्या चार उत्पादनांमध्ये मानवासाठी विषारी असणारे आणि मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकणारे घटक आढळून आले होते. गदारोळ झाल्यानंतर भारतातील औषध नियामकांनी चाचण्या घेतल्या. त्यांना संबंधित औषधांमध्ये कोणतेही अयोग्य घटक आढळले नाही आणि त्यांनी क्लीन चिट दिली. यात लाचखोरीचा प्रकार झाल्याचा दावाही करण्यात आला. पुढे काय झाले ते समोर आले नाही, मात्र आता एवढ्या मोठ्या प्रमाणात औषधे चाचणीत अपयशी ठरल्याची बातमी आली. आता प्रश्न असा आहे की या यादीत ज्या औषधांचा उल्लेख आहे त्यांचे सेवन किती जणांनी केले असणार आणि त्यांच्या आरोग्यावर त्याचा काही विपरीत परिणाम झाला असेल का? विशेष गोष्ट म्हणजे या ज्या गुणवत्ता चाचण्या घेतल्या जातात त्यांच्या निष्कर्षांना संबंधित औषध निर्मात्या कंपन्याही फारसे महत्त्व देत नसल्याचेही आढळून येते. आफ्रिकेतील देशाचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. चौकशीच्या रडारवर आलेल्या कंपन्यांकडून पुन्हा एकदा स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे. सर्वसामान्य लोकांना त्यांच्याबाबत सावध करण्यात आले आहे. हा केवळ सोपस्कार आहे. त्यातून प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत आणि कोणाचे नुकसान झाले असेल तर त्याचा दोष कोणाच्या माथी? गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरल्यानंतर आणि विक्रीवर बंदी घातली गेल्यानंतरही काही औषधांची बाजारात विक्री सुरू असते. ती ग्राहकांना उपलब्ध असल्याचेही यासंदर्भातील बातम्यांवरून स्पष्ट होते. गेल्याच आठवड्यात राजधानी दिल्लीतच मुदत संपलेल्या औषधांची विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले होते. यातून एकच बाब अधोरेखित होते की प्राण वाचवणारा हा व्यवसाय प्राणाला संकट निर्माण करणाराही ठरला आहे आणि ज्या बाबीची मनाई करण्यात आली आहे त्या बाबींची विक्री करण्यास खालच्या स्तरावर म्हणजे दुकानांच्या स्तरावर देखरेख करणारी यंत्रणाच उपलब्ध नाही आणि ती जर असेल तर तिला हे प्रकार रोखण्यात अपयश आले आहे.

# मन व शरीर साथ असेल तर हृदय शाबूत !

जगभरात जागतिक हृदय दिन हा दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी साजरा होत असतो. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि या आजारांचा जागतिक प्रभाव कमी करण्यासाठीच्या धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी तो साजरा केला जातो. हृदयाच्या आरोग्याबाबत लोकांना जागरूक करणे हा 'जागतिक हृदय दिना' चा मुख्य उद्देश आहे. काही वर्षांपासून हृदयविकारासंदर्भातील आजारांमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झाली असून अवघ्या तिशीत तरुणांनाही हृदयविकाराचा त्रास होऊ लागला आहे. बदलती जीवनशैली, अयोग्य आहार पद्धती, वाढता ताणतणाव, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन ही प्रमुख कारणे यामागे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितली. तरुणांनी हृदयविकाराला दूर ठेवण्यासाठी या बाबी टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे. कोणत्याही प्रकारच्या हार्ट-मॅजिक औषधांचा वापर करण्यापूर्वी त्याची खरंच आवश्यकता आहे का हेदेखील तपासून पाहणे आवश्यक आहे

भारतात वाढत्या हृदय रोगाचे प्रमाण हे निश्चितच धोक्याची सुचना आहे. जर योग्य काळजी घेतली तर आपण हृदयरोगास निश्चितच टाळू शकतो. मात्र त्यासाठी प्रतिबंधात्मक नियम पाळणे आवश्यक आहे. हृदयविकाराचे प्रमाण आणि त्यास कसे टाळावे, यासंबंधी जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. भारतात हृदयविकाराचे प्रमाण बघितले तर प्रत्येक ३३ सेकंदाला एक व्यक्ती हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु पावतो. शिवाय मधूमेहाचे सर्वाधिक रुग्ण भारतात आहेत व प्रत्येक मधूमेह रुग्णास हृदयविकार असल्याचे गृहित धरतोच. एकूणच जगभरातील सर्वाधिक हृदयविकाराचे रुग्ण भारतात आहेत. आणखी एक बाब म्हणजे भारतीयांना नैसर्गिकरीत्याच हृदयविकाराची जोखिम आहे; कारण आपल्या रक्तवाहिन्यांचा आकार पाश्चिमात्यांच्या तुलनेत छोटा आहे. शिवाय हृदयाच्या एकाहून अधिक रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज निर्माण होण्याचे प्रमाणही अधिक आहे. दुसरं म्हणजे वाढती लोकसंख्या व त्यामुळे निर्माण झालेली स्पर्धा, ताणतणाव, बदलती जीवनशैली आणि प्रदुषण देखील हृदयविकाराला पुरक ठरत आहेत. दहा वर्षांपूर्वी चाळीशीच्या खालील एखाद दुसऱ्या रुग्ण हृदयविकाराच्या झटक्याने इस्पितळात भरती व्हायचा. आता मात्र, शंभरातील ३० रुग्ण हे हमखास चाळीशीच्या खालील असतात.

आपण बघितलं की, आपल्याला हृदयरोगाची अधिक जोखिम आहे. त्यामुळे आपण हृदयरोग टाळण्यासाठी निश्चितच प्रयत्न केला पाहिजे. पण हृदयरोगाला टाळू शकणार नाही असे दोन घटक असतात, ते म्हणजे वय व अनुवांशिकता, या जोखिमा टाळता येणे शक्य नाही. पण जसे जसे वय वाढते किंवा अनुवांशिक दृष्टीने हृदयविकाराची संभावना असल्याचे लक्षात आले, तर टाळता येण्यायोग्य घटकांवर कार्य केले पाहिजे. टाळण्यायोग्य घटकांमध्ये रक्तदाब व मधूमेह, धुम्रपान व बैठी जीवनशैली आणि लठ्ठपणा व उच्च कोलेस्ट्रॉलची मात्रा या बाबींचा समावेश होतो. योग्य दिनचर्या व आहाराने या जोखिमा निश्चितच टाळता येतात. विशेष म्हणजे वय वाढत असताना, या जोखिमांना टाळण्यासाठी कार्य केले पाहिजे.

हृदयविकारासाठीची पहिली व सर्वात मोठी जोखिम म्हणजे मधूमेह. त्याच्यासोबत उच्चरक्तदाब, लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता या बाबी पर्यायाने येतातच. सोबत रक्तदाब हे केवळ हृदयच नव्हे तर मुत्रपिंड, मेंदू यावर प्रभाव पाडत पायांच्या रक्तवाहिन्यांमध्येही अडथळा निर्माण करतो. हे सगळे जीवनशैलीशी निगडीत विकार आहेत. आहार व व्यायामामुळे या बाबींना टाळता येऊ शकते. आपण जशी आर्थिक गुंतवणूक करतो तर काही वर्षांनी परतावा मिळतो. अगदी त्याच प्रकारे जेव्हा रोज व्यायामाची गुंतवणूक करू तर जीवनात परतावा मिळेल. पण व्यायामाच्या अभावी हृदयरोगाची जोखिम वाढत आहे. मात्र रोज पंधरा मिनिटे व्यायाम केला तरी हृदयविकाराची जोखिम १४ टक्क्यांनी कमी होते.

असे म्हटल्या जाते की, बसणे हे नव्या पिढीचे धुम्रपानच होय. जर आपण सलग खुप वेळ बसून कार्य करीत असू तर आपल्याला एका धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती एवढाच हृदयरोगाचा धोका असतो. आज तर सलग बसून काम करणे हे आपल्या जीवनशैलीचा भाग झाला आहे. त्यामुळे आता खुर्च्यांवर 'सिटिंग इज इंज्युरियस टू हेल्थ' असे लिहिणे आवश्यक झाले आहे.

व्यायामासंदर्भात काही महत्त्वाच्या बाबी समजून घेणे प्रत्येकाला आवश्यक आहे. कमीत कमी किती व्यायाम करावा, असा प्रश्न नेहमीच हृदयरोग तज्ज्ञांना विचारल्या जातो. आठवड्यातून पाच दिवस कमीत कमी ३० मिनिटं मध्यम तीव्रतेचा (मॉडरेट इंटेंसिटी) व्यायाम करणे अपेक्षित आहे. म्हणजे असा व्यायाम की, जो करतांना व्यक्ती आपल्या भवतालच्या व्यक्तीसोबत बोलू शकतो, त्यास दम लागत नाही. रोज चालणे वा जॉगिंग या व्यायाम प्रकारात मोडते किंवा आठवड्यातून तीन दिवस २५ मिनिटं थोडा तीव्र व्यायाम करणे अपेक्षित आहे. हा व्यायाम करतांना दम लागतो व आपल्या बाजूला असलेल्या व्यक्तीशी बोलणे शक्य नसते. धावणे व जलतरण या व्यायाम प्रकारात मोडतो. शिवाय दोन दिवस वजन उचलून स्वतःच्या क्षमता वाढविण्याचा व्यायाम ज्यास 'वेट ट्रेनिंग' म्हणतात, तो देखील करणे आवश्यक आहे. मात्र व्यायामाचा अतिरेक व्हायला नको.



आहार, जीवनाचा अविभाज्य घटक आहे. हृदयरोगात त्याचे महत्त्व तर अनन्य साधारणच आहे. पण हृदयरोगाचे निदान झाले किंवा हृदयरोग टाळावयाचा असेल तरी आपल्याकडे आहार अचानक बचलविणे शक्य नसते. कारण तो संस्कृती, परिसर, सभौतालच्या वातावरण व लोकांवर अवलंबून असतो. मात्र व्यायामाशी निगडीत काही ठोकताळे अथवा सर्वसाधारण नियम पाळले तरी आहारावर नियंत्रण आणता येईल. त्यापैकी पहिली बाब म्हणजे साखर किंवा साखरजन्य पदार्थांचे सेवन कमी किंबहुना वर्ज्य करणे. हल्ली तर रोजच्या जेवणानंतर 'डेजर्ट' म्हणून गोड खाण्याचे प्रमाण वाढले आहे. हे अयोग्य असून लठ्ठपणा, इन्सुलिन रेजिस्टंस, मधूमेह आणि पर्यायाने हृदयविकारास आमंत्रण दिल्यासारखे आहे. त्यामुळे साखर हा नव्या युगाचा तंबाखूच आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. दुसरं म्हणजे जे काही प्रिजर्व्ह अथवा डबाबंद आहे, ते हृदयासाठी घातकच आहे. त्या बाबी डबाबंद असल्यामुळे ताजे तर मुळीच नसतील. शिवाय टिकवून ठेवण्यासाठी रसायनांचा वापर देखील केल्या गेला असेल. हे रसायनं हृदयासाठी घातक ठरू शकतात. शेवटी आहाराच्या बाबतीत आणखी एक सुत्र लक्षात ठेवायचं की, जो आहार माझ्या आजीला माहित नाही, तो पदार्थ आरोग्यास योग्य नाही. अर्थात मार्केटिंगच्या काळात आजीला माहित असलेले पदार्थ डबाबंद करून विकल्या जात आहेत. मात्र येथे ही डबाबंद पदार्थ टाळले पाहिजेत.

सध्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अनेकजण अपुरी झोप घेतात आणि याचे दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतात. जेव्हा शरीर थकलेले असते, तेव्हा शरीराला झोपेची आवश्यकता असते. तज्ज्ञांच्या मते झोपेच्या कमतरतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. झोप ही माणसाच्या आरोग्यासाठी एक महत्त्वाचा घटक आहे. चांगल्या झोपेमुळे तुम्ही नेहमी निरोगी राहता. सध्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अनेकजण अपुरी झोप घेतात आणि याचे दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतात. जेव्हा शरीर थकलेले असते, तेव्हा शरीराला झोपेची आवश्यकता असते. तज्ज्ञांच्या मते झोपेच्या कमतरतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. झोप पूर्ण न झाल्यामुळे ऑक्सिडेटिव्ह ताण येऊ शकतो, ज्यामुळे रक्तवाहिन्यांच्या वॉलमध्ये एथेरोस्क्लेरोसिस दिसून येतो. यामुळे हृदयाशी संबंधित समस्या निर्माण होतात. ओएसए सारख्या झोपेच्या आजारांमुळेही अनेकांची झोप नीट होत नाही. या आजारांमध्ये श्वासनलिका वारंवार एकमेकांवर आदळतात, त्यामुळे झोपेत अडथळा निर्माण होतो.

आजच्या धावपळीच्या जगात जेव्हा आपण आपल्या कामाच्या ठिकाणी, घरामध्ये, शाळा इत्यादींमध्ये सतत तणावपूर्ण परिस्थितीला तोंड देत असतो, तेव्हा तणाव सातत्याने असतोच, ज्यामुळे आपल्याला क्रोनिक स्ट्रेस डिसऑर्डर विकसित होऊ शकतो. तणावांमुळे हृदयाचे आजार होतात! हे वाक्य जरी आपण डॉक्टर, मित्र आणि कुटुंबीयांकडून दररोज ऐकले असेल. पण हे जैविक आणि वैद्यकीय संशोधनावर आधारावर सांगितले जाते. तणाव हा चिंता आणि भितीदायक स्थितीमध्ये आपल्या शरिराकडून मिळणारी प्रतिक्रिया आहे. वाघ पाठीमागे लागल्यासारख्या परिस्थितीमध्ये, जेव्हा आपल्या समोर आलेल्या परिस्थतीचा सामना करायचा असतो अशा स्थितीमध्ये आपले शरीर त्वरित प्रतिक्रिया देते. यालाच आपण आल्पकालीन ताण येतो.

भयावह परिस्थिती संपल्यानंतर शरीर आपोआप सामान्य स्थितीत येते. पण आल्पकालीन ताण जात नसेल तर काय करावे? तणावपूर्ण परिस्थितीत आपल्या शरीरात दोन हार्मोन्स कॉर्टिसॉल आणि ॲड्रेनालाईन सोडले जातात. कॉर्टिसॉल तणाव परिस्थितीत साखरेला उर्जेचा स्रोत म्हणून सोडण्यात मदत करते, तर ॲड्रेनालाईन शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांमध्ये रक्त प्रवाहाला प्राधान्य देण्यासाठी मदत करते. जसे की पायांमधील स्नायू, इतर रक्तवाहिन्या आकुंचन पावते आणि हृदय गती वाढवते ज्यामुळे अतिरिक्त ऑक्सिजनयुक्त रक्त तयार होते आणि ते स्नायूंपर्यंत पोहोचू शकते. रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळे उच्च रक्तदाब होतो.

************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# पर्यटनाचे नवे आयाम!

पर्यटन म्हणजे केवळ प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे नव्हे. पर्यटनाकडे केवळ मनोरंजन, हवापालट म्हणून पाहिले जाता कामा नये. बॉर्डर पर्यटन, तुरूंग पर्यटन आणि कृषी पर्यटनाविषयी आज जागतिक पर्यटन दिनी जाणून घेऊया. बॉर्डर पर्यटन – गुजरातमधील नादाबेट येथील भारत व पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमारेषा आता पर्यटन स्थळ म्हणून विकसित केले जात आहे. सीमाभाग पर्यटन विकसित करण्याच्या या नावीन्यपूर्ण दृष्टिकोनामुळे देशातील जनतेला सीमाभागाविषयी जाणून घेण्याची आणि त्यावेळी या पर्यटनाचा आनंद घेण्याची संधी मिळणार आहे. नादाबेटला भेट देणार्या पर्यटकांना सीमाभाग पाहता यावा यासाठी इथे व्ह्यूइंग डेकही तयार करण्यात आले आहे. पर्यटकांना या टॉवरवरून सीमाभागाचा अप्रतिम नजारा पाहता येईल. तसेच रीट्रीट सेरमनीसाठी इथे परेड ग्राउंडही आहे. या परेड ग्राउंडवर बीएसएफ जवान रीट्रीट सेरमनी करतील. या रीट्रीट सेरमनीचा अनुभव म्हणजे नादाबेटला भेट देणार्या प्रत्येक पर्यटकासाठी देशभक्तीची भावना जागवणारा आहे. देशाचे रक्षण करताना प्राण गमावलेल्या धाडसी सैनिकांच्या स्मरणार्थ इथे 'अजय प्रहारी' हे स्मारक उभारण्यात आले आहे. या स्मारकाला भेट देणार्या पर्यटकांना या शहिदांना श्रद्धांजलीही वाहता येईल. सुंदर म्युरल्सने सजलेले ३० फूट उंच टी जंक्शन हा सीमा दर्शन कॉम्प्लेक्समधील आकर्षणाचे केंद्र असणार आहे. त्याचप्रमाणे टी जंक्शनपासून झीरो पॉईंटपर्यंत रस्त्यावर एक व्यासपीठ उभारण्यात आले आहे. यावर सरफेस मिसाइल, सरफेस टू सरफेस मिसाइल, टी-५५ टँक, आर्टिलरी गन, टॉरपेडो आणि मिग २७ विमाने प्रदर्शनार्थ ठेवण्यात आली आहेत. यामुळे सीमा दर्शनासाठी येणार्या पर्यटकांना लष्कर आणि संरक्षण दलाची सज्ञता कशी असते, हे अनुभवता येईल. नादाबेट सीमा दर्शनाला भेट देणार्या प्रत्येक पर्यटकाकडे सरकारी मान्यतेचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. पर्यटकांना रस्तामार्गे सहज सीमा दर्शन-नादाबेटला पोहोचता येईल. अहमदाबादपासून २६२ किमी वडोदरापासून ३७२ किमी, राजकोटपासून ३१५ किमी, सुरतपासून ५२४ किमी, भावनगरपासून ३७१ किमी




आणि भूजपासून २६५ किमी इतके अंतर आहे. अहमदाबाद हे जवळचे विमानतळ आहे. पार्किंग, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, अराइव्हल प्लाझा, बसण्याची जागा, दुकाने, रीटेनिंग वॉल अशा विविध सुविधाही इथे पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रात्री नादाबेटला सौर ऊर्जेने प्रकाशमान करण्यासाठी सोलार ट्रीजसुद्धा उभारण्यात आले आहेत. तुरूंग पर्यटन – जगभरात तुरूंग पर्यटनसारखे प्रयोग सुरू आहेत. भारतातसुद्धा अंदमान येथील तुरूंग व दक्षिणेकडील काही ठिकाणी तुरूंग पर्यटनचा प्रयोग सुरू आहे. तुरूंग पर्यटन हे संशोधनासाठी उपयोगी आहे तसेच त्या माध्यमातून सामाजिक जनजागृती करून समाजाचा तुरूंग व तुरुंगातील बंदी यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे हा मुख्य उद्देश आहे. ज्या वेळी व्यक्ती तुरुंगातील शिक्षा भोगून किंवा जामिनावर, किंवा निर्दोष सुटका होऊन परत मुख्य प्रवाहात जातो त्यावेळी समाजाकडून अशा व्यक्तीचे अतोनात हाल होतात. त्यांच्यावर अदृश्य बहिष्कार टाकला जातो. त्यांच्या कुटुंबाला तुच्छ वागणूक दिली जाते. बर्याचदा अशांना त्यांच्याच नातलग, मित्र परिवार व जवळच्या लोकांकडून हीन दर्जाची वागणूक मिळते. परिणाम स्वरूप हे लोक मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले जातात. ते गुन्हेगार असो वा निर्दोष त्यांच्या पुढे बहिष्कार सदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यातील अनेक आपली शक्ती हरवून बसतात. त्यामुळे ते समाजाशी लढण्याऐवजी गुन्हेगारीचा मार्ग पत्करतात. त्यामुळे तुरूंग पर्यटनासारखे उपक्रम नक्कीच समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी उपयोगी ठरणार. तसेच समाजशास्त्र व गुन्हेगारी शास्त्र याच्या संशोधनालासुद्धा वाव मिळणार यात शंका नाही. याव्यतिरिक्त नागरिकांना ऐतिहासिक घटनांचं ठिकाणे पाहता येऊ शकतील. परंतु आपल्याकडील तुरूंग खरोखरच संशोधन व पर्यटनासाठी योग्य आहेत का? जगभरात तुरूंग हे बंद्यांचे अधिकार व त्यांच्या पुनर्वसनाबाबत संवेदनशील असताना आपल्याकडील तुरुंगाची परिस्थिती अतिशय बिकट आहे. जनावरांचा कोंडवाडा तरी बरा असतो अशी आपल्याकडील तुरुंगांची अवस्था आहे. कमी जागेत ते बंदी कसे राहात असतील याचा विचार यानिमित्ताने होणे गरजेचे आहे. तुरूंग म्हटले की जे चित्र आपल्या डोळ्यापुढे उभं राहते ते भयावह आहे. तुरुंगातील अमानुषता, असंवेदनशील प्रशासन, धनदांडग्या, राजकीय, अंडरवर्ल्डशी संबंधित बंद्यांना मिळणारी व्हीआयपी वागणूक याविषयी अनेकदा प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. सामान्य बंद्यांना जे अन्न पुरविले जाते ते इतके सुमार दर्जाचे असते की त्याबाबत विचारायलाच नको. वैद्यकीय सुविधा तर नावालापण उपलब्ध नसते. जरी कागदोपत्री शासकीय नियमात व जेल मॅन्युअलमध्ये बर्याच तरतुदी असल्या, तरी प्रत्यक्षात काय मिळते हे तेथे राहणार्यांनाच माहिती असते. अगणित बंद्यांचे आरोग्याचे प्रश्न उद्भवतात तर अनेक मृत्यूमुखी पडतात. याव्यतिरिक्त अनेक आरोपी निव्वळ वकील करण्यासाठी व जामीन रक्कम भरण्याइतकी किरकोळ रक्कम पण जमवू शकत नसल्याने त्यांना अनेक महिने व वर्षे तुरुंगात खितपत राहावे लागते. यापेक्षा दयनीय परिस्थिती परदेशी आरोपी व कैद्यांची असते. त्यांचा जामीन मंजूर झालेला असला तरी निव्वळ त्यांची हमी घेणारं स्थानिक कोणी नसल्याने ते तुरुंगात खितपत पडलेले असतात. त्यातील अनेक कालांतराने निर्दोष सुटतात. यंत्रणा फक्त त्यांच्या अधिकारांचेच हनन करीत नाही, तर समाजविघातक समूह निर्माण करण्यात हातभार लावते. त्यामुळे तुरूंग पर्यटन उपक्रम फक्त पिकनिक न होता व्यापक सामाजिक परिवर्तन होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे ही अपेक्षा. कृषी पर्यटन – सध्या शहरी लोकांना आकर्षित करत आहे, ते म्हणजे कृषी पर्यटन. शहरातलं वाढतं प्रदूषण, जिथे बघावं तिथे दिसणारं काँक्रीटचं जंगल, ट्रॅफिकचा कोलाहल, इच्छितस्थळी वेळेवर पोहोचण्यासाठी होणारी जीवाची घालमेल, घड्याळाच्या काट्याबरोबर धावणं, ट्रेन किंवा बसमध्ये खचाखच भरलेली माणसं आणि एवढं करून ऑफिसला पोहोचल्यावर ऑफिसचा ताण तो वेगळाच. अशावेळी एखाद्याला गावाकडे जाऊन राहावं असं वाटलं, तर नवल ते काय! शहरातल्या माणसांना गावचं आकर्षण हे असतच. म्हणूनच दोन दिवसांसाठी का होईना, पण गावातलं वातावरण अनुभवायचं असेल, तर कृषी पर्यटनासारखा दुसरा पर्याय नाही. शेणाने सारवलेलं ऐसपैस घर, जणू आपला स्वतंत्र असा छोटासा वाडा, शुद्ध हवा, घराबाहेर पडवीत एक विहीर, विहिरीवरून पाणी काढणं, चुलीवरचं जेवण, लांबवर जिथे नजर जाईल, तिथवर पसरलेलं शेत, आपल्याच शेतातल्या फळभाज्यांनी युक्त असलेलं जेवण, घरात झोपाळा, अंगणात फुलांची सुंदर मोठी बाग, गोठ्यात गायी, म्हशी आणि एखादं अल्लड वासरू, गायी म्हशीचं अस्सल शुद्ध दूध, रात्रीच्या वेळी अधून मधून दिसणारे काजवे, सकाळचं अंगणात पडलेलं कोवळं ऊन, बैलगाडीतून केलेला प्रवास, शेकोटी पेटवून थंडीच्या दिवसात शेतावर केलेली हुरडा पार्टी, आहाहा, हे चित्र नक्कीच आपल्या मनाला सुखावतं. शेतीसारख्या पारंपरिक व्यवसायाला चालना मिळण्यासाठी त्याच्या जोडीला पूरक असा, कृषी पर्यटन व्यवसाय शेतकर्यांना नवी उभारी देण्यास नक्कीच मदत करेल. यातून आजचा तरुण शेतकरी, शेतीकडे नक्की वळेल. ऑस्ट्रेलिया, ब्राझील, इटली, अमेरिका आणि बर्याच देशांमध्ये शेतीला पूरक म्हणून कृषी पर्यटनाला प्राधान्य दिले गेले आहे. त्याच धर्तीवर भारतामध्ये कृषी पर्यटनाची सुरुवात ही पहिल्यांदा महाराष्ट्रापासूनच झाली. महाराष्ट्रात २००४ सालापासून हे क्षेत्र विकसित व्हायला सुरुवात झाली आणि आतापर्यंत जवळ जवळ ३५० कृषी पर्यटन केंद्र स्थापन झाली आहेत. यानिमित्ताने गावातला शेतकरी गावात राहण्यास मदत होईल, शेतीमध्ये नवनवीन प्रयोग आणि कल्पकता यांची सांगड घालून शेतीला यापुढे नक्कीच चांगले दिवस येतील. खेड्यांचा विकास तर होईलच परंतु कृषी पर्यटनाद्वारे एकूणच देशाचाही विकास होण्यास मदत होईल.

# शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६६ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– आपण सर्वांना ज्ञात आहेच की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास इलाखा शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनच्या वतीने रावबहादुर एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची प्रचंड जाहीर सभा संपन्न झाली होती. त्यात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय. म्हणून संदर्भीय ऐतिहासिक विधानाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीवर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन ( : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २२ सप्टेंबर २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना अनामी मोरे म्हणाले की, शासनकर्ती जमात बनण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व संदेशांना नीट समजून घेणे आवश्यक आहे. शिका म्हणजे नेमके काय? शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जे प्राशन करील ते गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे बाबासाहेब म्हणाले होते. तर मग आज शिकली सवरलेली मंडळी गुरगुरतायत काय? तसे होत नसेल तर अशा निकृष्ट दर्जाच्या शिक्षणाचा फारसा उपयोग होत नसतो. संघटीत होऊन लढा दिला तर यशस्वी होणे शक्य असताना आपण तसे का करीत नाही? बुद्धीमान माणसांची लेकरे बुद्धीमानच असली पाहिजेत असे अपेक्षित असताना आपले आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्ञानाचे प्रतीक समजले जात आहे तर आपण अनुयायी म्हणून कुठे आहोत? कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम केले पाहिजे हे अपेक्षित असले तरी त्याच्या आर्थिक नियोजनाचे काय? करिता उत्कृष्ट दर्जाच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. जेणेकरून चळवळीची उपयोगिता समजून घेता येईल. परिणामी शासनकर्ती जमात होणे शक्य होईल.

याप्रसंगी नवाब पटेल यांनी चळवळीच्या यशस्वीतेसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. अन्वर अली नूर जाफर म्हणाले की, केवळ भाषणकर्ते होऊन शासनकर्ते होता येणार नाही तर भाषणातील वक्तव्यावर प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल. एकत्रित येऊन आरोग्य समस्या निराकरणासाठी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलस निर्माण करून सहकारी तत्त्वावर चालविली पाहिजेत. लग्न समारंभावरील अवाढव्य खर्च कमी करून विधायक कार्यात सहभागी होऊन आर्थिक हिस्सेदारी प्रदान केली पाहिजे. एक दिवस जयंती साजरी करणारे वर्षभरातील ३६४ दिवस काय करतात? याची तपासणी केली पाहिजे. किमान समान तत्वावर तरी आपण एकत्रित का येत नाहीत? हे करू शकलो तरच आपण या देशाची शासनकर्ती जमात होऊ शकतो. जो मार्केट में सस्ता होता है, वो मेस में पकता है। हे लक्षात घेऊन मार्गक्रमण करू शकलो तर यश आपल्या पाठीशी उभे राहील. महादेव डांबरे म्हणाले की, २४ सप्टेंबरला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. याच दिवशी पुणे करार झाला होता. याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शासनकर्ती जमात होण्याच्या अनुषंगाने संदेश दिला होता. म्हणून सर्व अडचणी बाजूला सारून महत्त्वपूर्ण मुद्यावर प्राधान्यक्रमाने कार्य केले पाहिजे. गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी विशेष व्यवस्था केली जावी अशी मागणी केली होती. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी, मी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी भीमगर्जना केली होती. तर आमचे प्रतिनिधी कवितेत मग्न असतात आणि हिंदू म्हणून मरणार असल्याचे जाहीर वक्तव्य करतात. ही बाब आपल्यासाठी लाजिरवाणी आहे. अहंकार बाजूला ठेवून एमआयएम, वंचित, बीएसपी सारख्या सर्व पक्षांनी एकत्र येऊन मोट बांधली तर राजकीय क्षेत्रात यशस्वी होऊन शासनकर्ती जमात होण्याची स्वप्ने साकार करता येतील.

प्रमुख वक्ते एड. राजू बागूल म्हणाले की, पूर्वी शासकीय नौक–या करने म्हणजे शासनकर्ते असल्यासारखे वाटायचे आता याची जाणीव होत चालली आहे की विधायिकेत जाऊन प्रतिनिधित्वाची भूमिका पार पाडणे म्हणजे शासनकर्ते होण्यासारखे आहे. शासनकर्ती जमात होण्यासाठी आपण आपल्या स्वतः च्या परियायी स्वतंत्र मेडियाची निर्मिती केली पाहिजे, जेणेकरून गोबेल्स नीतिला खोडून काढता येईल. अयोध्या सारख्या खुल्या प्रवर्गातील मतदारसंघातून अवधेशप्रसाद सारखे उमेदवार निवडून येऊ शकतात. तसेच चंद्रशेखर आझाद सारख्या व्यक्ती सुद्धा जिंकू



शकतात. हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे. ही प्रक्रिया देशभरात राबविण्यात यावी जेणेकरून शासनकर्ती जमात होणे शक्य होईल. ईव्हीएमचे प्राबल्य नष्ट केले तर सत्ता बहुजनांची असेल. करिता आपण सर्वांनी हिरीरीने राजकारणात सहभागी झाले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केलेल्या आहेत. २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास येथे संपन्न झालेल्या सभेत सुरूवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मद्रास आणि द्रविड वर्कर्स असोसिएशन, साऊथ इंडियन बुद्धिष्ट असोसिएशन, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन ऑफ दि सिव्हिल एंड मिलिटरी स्टेशन बंगलोर, मद्रास शेड्युल्ड कास्ट्स स्टुडंटस असोसिएशन सह इतर अनेक संस्था मार्फत मानपत्रे देण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भाषणात द्वितीय गोलमेज परिषदेतील एकंदर स्थितीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. पहिल्या गोलमेज परिषदेला अनुपस्थित असलेल्या गांधींला कॉंग्रेसने द्वितीय गोलमेज परिषदेला संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठी पाठविले होते. मात्र त्यांनी सायमन कमिशनच्या शिफारशीवरच समाधान मानले होते. सायमन कमिशनच्या शिफारशी मंजूर करून घेण्यासाठी कॉन्झर्व्हे टीव्ह, लेबर व लिबरल पक्षाचे जे कमिशन स्थापन करण्यात आले होते. त्या समोर सप्रू, जिन्ना व आंबेडकर यांनी आवाज उठविला होता. ज्यामुळे सरकारला नवीन समिती स्थापन करने भाग पडले होते. बाबासाहेब आंबेडकरांनी हे पण स्पष्ट केले होते की, हिंदूस्थानातील व संस्थानिकांतील राजकारणी हे एक़च असले तरी त्यांची विभागणी होऊन १५० वर्षे झाल्याने व त्यांना मिळालेले राजकीय शिक्षण भिन्न असल्याने त्यांची भेसळ करू नये. द्वितीय गोलमेज परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत गांधीं म्हणाले होते की, माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. परिणामी दुसऱ्या दिवशी डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षांच्या अनुमतीने प्रज्येचे प्रतिनिधी संस्थानिकांनीच पसंत करण्यासाठी कॉंग्रेसच्या वतीने बोलण्याची त्यांना अनुमती मिळाली आहे काय? कॉन्झर्व्हेटीव्ह पार्टीला हव्या असलेल्या निवडणुकांना सर्वांचा विरोध असताना गांधींने ते का मान्य केले आहे? असे प्रश्न गांधींना विचारले होते ज्यांला त्यांनी प्रत्युत्तर दिले नाही. पुढे आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी खास हक्क म्हणजे स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती. ज्याला सरकारने पाठिंबा दिला होता. परंतु गांधींने विरोध करून आमरण उपोषणाचे शस्त्र उगारले परिणामी पुणे करार होऊन अस्पृश्यांना मिळालेले स्वतंत्र मतदारसंघ गमवावे लागले. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, जातीय प्रश्न क्षितिजावर दिसू लागल्यापासून आपल्या सार्वजनिक आयुष्यात गांधींनी जर काही केले असेल तर ते अस्पृश्यांकडे दूर्लक्ष करणे हेच होय. या सर्व घडामोडीवर उपाय योजना म्हणून जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा होय. हे आपण जनमानसावर बिंबविले पाहिजे. या अनुषंगाने वर्तमानात आपण कुठे आहोत? काय कमावले आणि काय गमावले? याची जाणीव व्हावी म्हणून जाणीवपूर्वक या विधानाच्या अनुषंगाने चर्चा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला नवाब पटेल, बी. बी. मुजमुले, एड. राजू बागूल, अनामी मोरे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे महादेव डांबरे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# लोकअदालत सह शास्ती माफी योजनेस प्रचंड प्रतिसाद

## उस्फुर्त प्रतिसाद पाहता १००% शास्ती माफी योजनेस उद्या(रविवार) एक दिवस मुदत वाढ











लातूर/प्रतिनिधी:– लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकाकडून सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात १००% कर वसुली करण्याचे निर्दे श मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबवित आहे.. त्यानुसार मालमत्ताधारकाना विविध सूट/सवलती देण्यात आले होते. सोबतच थकबाकीदार मालमत्ताधारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे लोकअदालत मधे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याकरिता १००% शास्ती माफी योजना एक दिवसासाठी संपूर्ण मालमत्ता धारकासाठी लागू करण्यात आली होती. त्यामध्ये लोकअदालत सोबतच शहरातील इतर थकबाकीदार असे मिळून तब्बल २५०० थकबाकीदार मालमत्ता धारकाकडून एकाच दिवसात ९कोटी ३० लाख चा कर संकलन करण्यात कर विभाग यशस्वी झाला आहे.. १००% शास्ती माफी योजना व लोक अदालत मधे अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक सतिष टेंकाळे, मनपा कायदे सल्लागार ऍड. येरटे, क्षेत्रीय अधिकारी माने मॅडम, श्री अजित डोपे, श्री पवन सुरवशे, श्री राजुरे यांच्यासह सर्व कर पर्यवेक्षक व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले.

सदरील सुटला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून लोकअदालत सह क्षेत्रीय कार्यालयात नागरिकानी टॅक्स भरणा करण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.. सदरील योजनेस मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद पाहता व काही नागरिकांना वैयक्तिक अडचणी मुळे लाभ घेता आला नसल्याने व त्यांची मागणी असल्याने सदरील योजनेस एक दिवस मुदतवाढ देण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. त्यादृष्टीने सर्व क्षेत्रीय कार्यालये उद्या (रविवारी) सुद्धा सुरु राहणार असून , मुदतवाढ दिलेल्या १००% शास्ती माफी योजना या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन टॅक्स भरून महांपलिकेला सहकार्य करावे असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

# भाजपा लातूर ग्रामीण विधानसभा ताकतीने लढणार भाजपाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना आ.रमेशआप्पा कराड यांचे आवाहन

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात महायुतीतील पक्ष आणि उमेदवारी याबाबत काहीजण सुपारी घेऊन जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र या मतदार संघात भारतीय जनता पार्टी ताकतीने निवडणूक लढणार आहे. पक्षश्रेष्ठींच्या आदेशान्वये मीच भाजपाचा उमेदवार असून कार्यकर्त्यांनी आजपासून मतदान होईपर्यंत जिद्दीने, उमेदीने आणि जोमाने कामाला लागावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.





रेणापूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख, पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्ती केंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुख यांची बैठक लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी झाली यावेळी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, छत्तीसगड येथील नंदकिशोर राणा, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या विविध विकास कामाचा आढावा घेणाऱ्या लातूर ग्रामीण मतदार संघ माझे कुटुंब ही कार्यपुस्तिका भाजपाच्या वतीने तयार करण्यात आली असून या पुस्तिकेचे यावेळी प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली अनेक वर्ष गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या आणि शेतकरी शेतमजुराच्या न्याय हक्कासाठी सातत्याने संघर्ष केला, सत्ता असो अथवा नसो माझे कार्यकर्ते कधीच डगमगले नाहीत याच कार्यकर्त्यांच्या जोरावर आजपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मोठे यश मिळविले. पक्षश्रेष्टीने माझ्या कार्याची दखल घेऊन विधान परिषदेचे आमदार केले या आमदारकीचा गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी उपयोग केला. मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत विविध विकास कामासाठी, लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा विकास निधी आणण्यात मला यश आले.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रशासन आणि राज्यातील महायुती शासनाने महिला, शेतकरी, गोरगरीब, गरजू लाभार्थ्यांसाठी अनेक जनकल्याणकारी योजना सुरू केल्या या योजनेचा समाजातील सर्व जाती धर्मांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला. मतदार संघातील गावागावात झालेली विविध विकास कामे, सामाजिक कामे आणि विविध योजनेतील वैयक्तिक लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना कार्यकर्त्यांनी भाजपाच्या माध्यमातून झालेल्या कामाची आठवण करून द्यावी असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, ही निवडणूक कार्यकर्त्यांच्या स्वाभिमानाची लढाई आहे. मराठा समाजाला न्याय देण्याचे काम देवेंद्र फडणवीस आणि भाजपानेच केले असून जाती–जातीत भांडणे लावण्याचे आणि जातीपातीचे राजकारण करण्याचे पाप कॉंग्रेस आणि शरद पवार यांनी केले आहे. मराठा समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी भाजपा नेतृत्वानी मराठा समाजाला दिलेले दहा टक्के आरक्षण, ओबीसीच्या सर्व सवलती, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे मोठ्या प्रमाणात केलेले कर्ज वाटप, विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या सवलती या सर्व बाबतीत भाजपाच्या मराठा कार्यकर्त्यांनी समाजासमोर पक्षाची भूमिका स्पष्टपणे मांडावी असेही त्यांनी बोलून दाखविले.

या बैठकीत भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले म्हणाले की, आजपर्यंत आ. रमेशअप्पा कराड यांनी मतदार संघातील विकास कामासाठी विकास कामाच्या माध्यमातून खूप काही दिले आहे. आता येणाऱ्या काळात आप्पासाठी कार्यकर्त्यांनी मेहनत घेण्याची गरज असल्याचे बोलून दाखवले तर छत्तीसगडचे नंदकिशोर राणा यांनी संघटनात्मक कामाच्या माध्यमातून प्रत्येकानी आपले बूथ जिंकण्यासाठी मेहनत घ्यावी यासाठी सूचना केल्या. प्रारंभी ॲड. दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रस्तावित केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या बैठकीस रेणापूर तालुक्यातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्ती केंद्र प्रमुख आणि बुथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिपगंगा भागीरथी संस्था व शासकीय रुग्णालय सांगली व मिरज यांचे संयुक्त विद्यमाने मिरज येथे विनामूल्य सामुदाईक आरोग्य शिबिर संपन्न



सांगली : – राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष मा. उपमुख्यमंत्री (गृह,विधी व न्याय) यांचे कार्यालय, मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचे समन्वयाने, महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना, पंतप्रधान आरोग्य योजना, वैद्यकीय विद्यापीठे (एमओएचइ) आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय यांचे संयुक्तिक आयोजनाने, पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचे वाढदिवस निमित्त आरोग्य सेवामहा कार्यक्रम, सामाजिक आरोग्य शिबिर राबविण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याच्या मुख्य उद्देशाने, दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित, शारदा वृद्धसेवाश्रम मिरज यांचे सहकार्याने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज आणि पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली यांचे वतीने, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, इंदिरानगर झोपडपट्टी मिरज येथे विनामूल्य सामुदाईक आरोग्य शिबिर संपन्न झाले. दिपगंगा भागीरथी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे आणि आरोग्यवर्धिनी उपकेंद्रचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रथमेश पाटील यांचे शुभहस्ते फीत कापून विनामूल्य सामुदाईक आरोग्य शिबिराचे उदघाटन केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियांका पाटील, मिरज सिव्हिल हॉस्पिटलचे समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) सूर्यप्रकाश राऊत आणि राजेंद्र देसाई यांचे शुभ हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत धन्वंतरी प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून शिबिराची सुरवात करण्यात आली. इंदिरानगर झोपडपट्टी, मिरज आणि परिसरातील एकता कॉलनी, दत्त कॉलनी, महादेव कॉलनी, नुराणी गल्ली, खोत नगर येथील बहुतांश नागरीक / रुग्णांनी भरपूर प्रमाणात आरोग्य शिबिरास प्रतिसाद दिला, विविध विभागातील तज्ञ डॉक्टरांचे मार्फत नागरिक, रुग्णांनी आपल्या आरोग्याची विनामूल्य रक्त लघवी आणि इ.सी.जी. इत्यादी अत्यावश्यक तपासण्या करून घेत, अत्यावश्यक औषधांचा लाभ घेतला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज आणि पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगलीचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, उपाधिष्ठाता डॉ. अहंकारी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रियांका राठी, वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. रुपेश शिंदे, पी.एस.एम. विभागचे डॉ. अस्वार, समाजसेवा विभाग प्रमुख तथा नोडल ऑफिसर संजय खाडे, धर्मादायचे निरीक्षक सचिन पाटील यांचे मार्गदर्शन आणि विशेष वैद्यकीय मदत कक्षचे समन्वयक रामेश्वर भाऊ आणि मनपा वैद्यकीय आरोग्यधिकारी डॉ. वैभव पाटील यांचे सहकार्य लाभले. पी.एस.एम. विभागचे डॉ. नितीन चिकूर्डेकर आणि डॉ. इरफान सय्यद तसेच मेडिसिन विभागचे डॉ. भूषण पाटील, बालरुग्ण विभागचे डॉ. पियुष, सर्जरी विभागचे डॉ. मोनिका, स्त्रीरोग विभागाचे डॉ. अर्पिता, जनसंपर्क अधिकारी आर्यदिप लोंढे, प्रसन्न कंदी, विशाल भोरे, यश बावले, विशाल म्हेतर, अभंगे तसेच आरोग्यवर्धिनी उपकेंद्रचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रथमेश पाटील, डॉ. प्रिया पाटील, स्टाफ नर्स प्रियंका लोंढे, आरोग्य सेवक धनंजय मगदूम तसेच वानलेस हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज स्टाफ, आशा वर्कर, कर्मचारी वर्ग यांनी अथक परिश्रम घेतले.


समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) तथा कॅम्प समन्वयक सूर्यप्रकाश राऊत यांनी नागरिकांना सदर विनामूल्य आरोग्य शिबिरात सहभाग घेण्यास आव्हान केले. उपस्थितांचे स्वागत करत सदर आरोग्य शिबिरात सहभाग घेतलेल्या रुग्णांना, शिबीरपश्चात त्यांच्यावर अत्यावश्यक विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, सदर रूग्णांना आयुष्यमान भारत कार्ड देणार असल्याची माहिती दिली. शारदा वृद्धसेवाश्रम संकुलाच्या संचालिका शारदा लोंढे यांचे प्रमुख उपस्थितीत समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) राजेंद्र देसाई यांनी सर्व अधिकारी, डॉक्टर, नर्स, कर्मचारी स्टाफ तसेच आशा वर्कर आणि सहभागी सर्व नागरिक, रुग्णांचे आभार मानले.

# रेणा साखर कारखान्याने नेहमीच बांधिलकी जोपासून शेतकऱ्यांचे हित साधले

## सहकार महर्षी मा. श्री.दिलीपरावजी देशमुख यांचे प्रतिपादन







निवाडा :- सहकार क्षेत्रात काम करत असताना रेणा सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांनी प्रति असलेली आपली बांधिलकी कायम ठेवत नेहमीच त्यांचे हीत जोपासले असल्याचे सांगून रेणा साखर कारखाना मागील गळीत हंगामात गाळप ऊसाला शंभर रुपयाचा हप्ता देणार असल्याचे व दिपावली निमित्ताने सवलतीच्या दरात साखर,रेणा कर्मचाऱ्यांना १६.६६ टक्के बोनस देणार असल्याचे कारखान्याचे मार्गदर्शक तथा संस्थापक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांनी जाहीर केले. २०२३-२४ रेणा सहकारी साखर कारखान्याच्या अधि सभेची वार्षिक साधारण सभेत ते बोलत होते. यावेळी सौ. सुवर्णाताई दिलीपरावजी देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे,माजी आमदार त्र्यंबक भिसे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे,व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, संचालक यशवंतराव पाटील, विजय देशमुख, प्रमोद जाधव, रवींद्र काळे, श्रीशैल उटगे,श्रीपतराव काकडे, सुभाष घोडके,अनुप शेळके, चंद्रचूड चव्हाण,राजकुमार पाटील, पृथ्वीराज शिरसाट, कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे,एच.जे.जाधव, सतीश वाकडे,गणेश येवले, पंडित देसाई यांच्यासह सर्व संचालक यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख म्हणाले की, मांजरा परिवारातील सर्व कारखान्यांच्या सर्वसाधारण सभा या स्नेह मेळावा असतो. कोणतीही तक्रार अथवा तणावाचे वातावरण येथे नसते. हे केवळ लोकनेते विलासराव देशमुख यांनी घालून दिलेल्या संस्कृतीमुळे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार म्हणाले धिरज विलासराव देशमुख की, मांजरा परिवाराने कायम शेतकऱ्यांना न्याय दिला आहे. एफआरपी पेक्षा नेहमीच जास्तीचा दर दिला आहे. जो विश्वास शेतकऱ्यांनी आमच्यावर टाकला आहे तो विश्वासा सार्थ ठेरवत अशीच यशस्वी वाटचाल मांजरा परिवाराची राहील असे त्यांनी सांगितले. नुतन खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी रेणा कारखान्याच्या कार्याचा गौरव करत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला म्हणूनच सक्षम नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रातील असंख्य पुरस्कार रेणास प्राप्त झाले असल्याचे सांगून रेणा परिवाराचे अभिनंदन केले. यावेळी कारखाना परिसरात उभारण्यात आलेल्या असवनी (३० के एल पी डी) विस्तारित प्रकल्प व सौर ऊर्जा (३५० किलो वॅट) प्रकल्पाचे उद्घाटन तसेच प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारे सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित खासदार शिवाजी काळगे यांचा देखील कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. सर्वसाधारण सभेत कार्यकारी संचालक बी व्ही मोरे यांनी विषयाचे वाचन केले व त्यास सर्व सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली. सर्वसाधारण सभेस शेतकरी, विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार कृषी उत्पन्न बाजार समिती संचालकाकडून महात्मा ज्योतिबा फुले भाजीपाला व

### व्यापारी, शेतकरी, ग्राहक सोयी सुविधा,पार्किंग व अन्य उपाययोजनाबाबत संबंधिताना



लातूर / प्रतिनिधी :- माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या भाजीपाला व गूळ मार्केट मधील व्यापारी, शेतकरी, ग्राहक यांच्यासाठीच्या सोयी सुविधाची पाहणी बाजार समिती संचालकाकडून करण्यात आली व संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शहरात महात्मा ज्योतिबा फुले भाजीपाला मार्केट तसेच रिंग रोड भागात गुळ मार्केट चालते. या भाजीपाला व गूळ मार्केट भागातील लहान मोठे व्यापारी, ग्राहक व शेतकरी यांना उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती कडून पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी सुविधा,वाहन पार्किंगसह अन्य आवश्यक बाबी याबाबत स्वतः पाहणी करून आवश्यक उपाययोजनाची माहिती सादर करावी तसेच संबधितांनी महात्मा ज्योतिबा फुले भाजीपाला मार्केट व गूळ मार्केट मधील व्यापारी, शेतकरी, ग्राहक यांना आवश्यक सोयी सुविधा निर्माण करून देण्यासाठी पावले उचलली जावीत आशा सूचना नुकत्याच माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाला दिल्या होत्या. या सूचनेनुसार आज दि.२७ सप्टेंबर रोजी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, विलास बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, संचालक बालाजी वाघमारे, वास्तुवीशारद अभिलाष बरबडे, आधिकारी यांनी पाहणी केली व व्यापारी गाळे स्वच्छता, रस्ते, नाली, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, सुरक्षा,मार्केट मधील वाहन पार्किंग व अन्य सोयी सुविधा याबाबत संबंधितांना आवश्यक सुचना करून याची अंमलबजावणी तात्काळ करन्यास सांगितले. उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, सदस्य,बाजार समितीचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## लातुरात महाराजा अग्रसेन जयंतीनिमित्त विविध सामाजिक - सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन


लातूर :- प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही लातुरात अग्रवाल समाज ट्रस्ट, लातूर, अग्रवाल समाज, लातूर, अग्रवाल महिला मंडल, लातूर, अग्रवाल नवयुवक मंडल , लातूर या समस्त अग्रकुटुंबाच्या वतीने महाराजा अग्रसेन जयंती निमित्त विविध सामाजिक - सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अग्रसेन जयंतीचे औचित्य साधून रविवार, दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी पोद्दार हॉस्पिटलच्या सौजन्याने सकाळी साडेदहा ते दुपारी दोन या वेळेत अग्रसेन भवन, लातूर याठिकाणी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात हाडांचा ठिसूळपणा, किडनी फंक्शन, ब्लड शुगर तपासणी, रक्त तपासणी, रक्तदाब तपासणी मोफत करण्यात येणार आहे. अग्रसेन जयंतीचे औचित्य साधून दिवाली सजावट स्पर्धा, सुदृढ बेबी स्पर्धा, स्वागत दुपट्टे तयार करणे, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, लहान मुलांसाठी लिटल शेफ स्पर्धा, वरिष्ठांची क्रीडा स्पर्धा, कुंडी सजावट स्पर्धा, चुनरी तयार करणे स्पर्धा, एक ते तीन वर्षाच्या बालकांसाठी तीन चाकांच्या सायकलची स्पर्धा, स्लो सायकल स्पर्धा, स्लो स्कुटर स्पर्धा, डान्स स्पर्धा, एक मिनिट गेम स्पर्धा, अंताक्षरी, अग्रवाल क्रिकेट लीग स्पर्धा, ध्वजारोहण, रक्तदान शिबीर, शोभायात्रा असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शनिवार, दि. २८ सप्टेंबर २०२४ ते गुरुवार,दि. ३ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत हे सगळे उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात येणार आहेत. महाराज अग्रसेनजी जयंती उत्सवानिमित्त गुरुवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अग्रसेन भवन या ठिकाणी मोरमुकुट देवकीनंदन ब्रिजवासी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता रक्तदान शिबीर होईल. गुरुवारी दुपारी तीन वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येईल. ही शोभायात्रा गंज गोलाईतील ईलमचंद सुपर मार्केट पासून सुरु होईल. ती गंज गोलाई,में रोड, हनुमान चौक, गांधी चौक मार्गे अग्रसेन भवन येथे पोहचेल. अग्रसेन भवन येथे ही शोभायात्रा पोहचल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर होतील. त्यानंतर सायंकाळी सात वाजता महाराजा अग्रसेन यांची आरती होईल. तत्पश्चात सायंकाळी सव्वा सात वाजता जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येईल. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार, अग्रवाल समाज ट्रस्ट चे अध्यक्ष नंदकिशोर इंद्रजजी अग्रवाल हे उपस्थित राहणार आहेत. अग्रसेन जयंतीनिमित्त आयोजित सर्व उपक्रमांचा अग्रवाल समाज बांधवांनी लाभ घ्यावा, कत्र्याक्रमात सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवावी,असे आवाहन अग्रवाल समाज ट्रस्ट, लातूर, अग्रवाल समाज, लातूर, अग्रवाल महिला मंडल , लातूर, अग्रवाल नवयुवक मंडल , लातूरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.




## बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन

मुंबई :- बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने मार्च-एप्रिल २०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत ( एस एस सी एच एस सी परीक्षेत ६०% पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या आणि विविध विद्याशाखेत पदवीधर व पदविकाधारक झालेल्या गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींचा सत्कार समारंभ सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ५:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास भिमराव की बेटी हूं फेम प्रबोधनकार गायिका दिक्षा राजेश शिर्के या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख वक्ते म्हणून उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, माजी कार्याध्यक्ष किशोर मोरे हे उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींना मार्गदर्शन करणार आहेत. सूत्रसंचालनाची धुरा सरचिटणीस राजेश घाडगे सांभाळणार असून शिक्षण समिती अध्यक्ष राजेश पवार प्रस्ताविक सादर करतील तर शिक्षण समिती, चिटणीस अशोक मोहिते आभार प्रदर्शन करतील तसेच उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, एच. आर. पवार, मनोहर मोरे, चंद्रमणी तांबे, अंकुश सकपाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी सर्व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनी, पालक, शाखा पदाधिकारी, व्यवस्थापक मंडळ, बौद्धाचार्य व सभासद यांनी उपस्थित रहावे अशी विनंती जनसंपर्क व प्रसिद्धी समिती अध्यक्ष रमेश जाधव व चिटणीस विश्वास मोहिते यांनी समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात केली आहे.

## महाराष्ट्राच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांनी 'भारतीय पत्रकारिता का इतिहास' ग्रंथाचे लेखक सरदार हरविंदरसिंह धुन्नाजी यांना दिल्या शुभेच्छा..




चंद्रपूर / प्रतिनिधी :- स्वातंत्र्यपूर्व काळापासून पत्रकारितेच्या क्षेत्रात झालेले मोठे बदल व वेळोवेळी अस्तित्वात आलेले नवीन कायदे नियम, बदलत केलेली पद्धती तसेच शतकांपासून आपल्या प्रामाणिक लेखणीने जनसामान्यांचा आवाज होणाऱ्या व स्वातंत्र्य संग्रामात मोलाची भुमीका बजावणाऱ्या विविध वृत्तपत्रांचा संघर्ष, स्थापना अशा विविध विषयांवर सखोल माहिती देणारा ग्रंथ 'भारतीय पत्रकारिता का इतिहास' (कल-आज-कल) ज्याचे निर्माते सरदार हरविंदरसिंह धून्नाजी यांनी वयाच्या १८ वर्षापासून पत्रकारितेत आपले अमूल्य योगदान देत त्यांच्या धारदार लेखणीने १९७२ पासुन प्रकाशित या वृत्तपत्रांच्या ५५ वर्षाच्या कालखंडात आवाज म्हणून न्याय, समता, हक्क, करून देतांना आपल्या ५५ वर्षाच्या ग्रंथाचा सखोल व बारकाईने अभ्यास करून माध्यमातून सहज अभ्यास करता यावा दैनिक खालसा संदेश, दैनिक मजदूर टाइम्स शासनास वेळोवेळी जनसामान्यांच्या अधिकार, कर्तव्य तसेच सामाजिक जाणीव अनुभवातून पत्रकारितेच्या अनेक जुन्या नवीन पिढीला या विषयाच्या एकाच ग्रंथाच्या म्हणून ४१२ पानांच्या 'भारतीय पत्रकारिता का इतिहास' (कल-आज-कल) या ग्रंथाची निर्मिती, लेखन, प्रकाशन केले व त्याची प्रत महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून सन्मान मिळविणाऱ्या श्रीमती. सुजाता सौनिक यांना प्रेषीत केली. त्यावर श्रीमती. सुजाता सौनिक यांनी लेखक, प्रकाशक सरदार हरविंदरसिंह धून्नाजी यांना या ग्रंथाच्या निर्मिती करिता शुभेच्छा देत ग्रंथ उपलब्ध करून दिल्या बाबत त्यांचे दिनांक २३ सप्टेंबर रोजी मुख्य सचिव कार्यालयाच्या अधिकृत मेलवरून आभारही व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे पत्रकारीतेच्या क्षेत्रात त्यांचे कायम आदरणीय व प्रेरणा असलेले दैनिक लोकमत, दैनिक लोकसत्ताचे पुर्व संपादक श्री. सुरेश द्वादशीवारजी यांनी तसेच दैनिक हिंदुस्थानचे संपादक श्री. उल्हास मराठे यांनीही या ग्रंथाच्या निर्मीती करीता त्यांचे कौतुक केले आहे. व हा ग्रंथ पत्रकारीतेत भविष्य घडवु पाहणाऱ्यांसाठी महत्वाची भुमिका बजावणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# हिंदी भाषेत रोजगाराच्या विपुल संधी- डॉ. डी.आर.भुरे



लातूर :- हिंदी भाषा जागतिक स्तरावरची भाषा बनलेली आहे. जागतिकीकरणाच्या युगामध्ये हिंदी भाषेला अत्याधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. एवढेच नव्हे तर तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये हिंदी भाषा फार उन्नती केलेली आहे. हिंदी भाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होत आहेत.यामध्ये फिल्म क्षेत्रापासून ते औद्योगिक क्षेत्रापर्यंत आणि तंत्रज्ञानापासून ते भाषांतरापर्यंत अनेक क्षेत्र आहेत ज्यामध्ये हिंदी भाषेचा उपयोग जास्त प्रमाणामध्ये होत आहे. एवढेच नव्हे तर नवीन शैक्षणिक धोरणामध्ये वैद्यकीय शिक्षणासोबतच तंत्रज्ञानाचे शिक्षण सुद्धा हिंदी भाषेत दिले जात आहे. यामुळे येणाऱ्या काळात हिंदी भाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. ते येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात हिंदी दिवस समारंभात प्रमुख पाहुणे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. वैशाली जयशेटे, प्रा. शैलेश कानडे, कला विभागाचे समन्वयक प्रा. रवींद्र सोनवणे, प्रा. विश्वनाथ स्वामी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यांनी आपली संस्कृती, भाषा आणि मूल्यांचे संगोपन करावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. घनश्याम ताडेवार यांनी केले. हिंदी पखवाडा उपक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयात विविध स्पर्धा पुढे डॉ. भुरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी रोजगाराच्या दृष्टिकोनातून हिंदी भाषेकडे पहावे. या भाषेच्या माध्यमातून पत्रकारिता, फिल्म, भाषांतर, पटकथा लेखन, गीत, आकाशवाणी आणि दूरदर्शन अशा विविध क्षेत्राकडे डोळसपणाने पहावे. अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, हिंदी मधुर भाषा आहे. ही भाषा जगभर प्रसिद्ध आहे. हिंदी भाषेत भारतच नसून जगभरामध्ये संवाद करणे सोपे झालेले आहे. नवीन शैक्षणिक धोरणात सुद्धा हिंदी भाषेकडे शासन विशेष लक्ष देत आहे. हिंदी भाषा भारताची भाषा आहे अशी ओळख जगामध्ये आहे. सोबतच विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा आणि वर्गामध्ये शिक्षकांच्या अध्यापनाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. आजचे हे विद्यार्थी भारताचे भावी नागरिक आहेत. घेण्यात आले होते या स्पर्धेमध्ये वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा आणि निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आले होते. यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आले.यात वक्तृत्व स्पर्धेत १.भावना राळवन २. अमृता डांगे ३. उमा पवार ४. हुलगुंडे अंबिका कविता वाचन स्पर्धा १. लोया निलाक्षी २. मठपती कामिनी ३. धनुरे मेघा निबंध लेखन स्पर्धा १.जाधव भक्ती बालाजी२.मुकडे सानिका धनंजय ३.पठाण शफी अताऊल्ला यावेळी कला व वाणिज्य शाखेतील प्रा. दीपक बजाज, प्रा. नागेश सुगरे, प्रा. शिवशंकर कामाजी, प्रा. मनोज वैरागकर, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा.एम.पी. नीला, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. शुभांगी खुब्बा, प्रा. विष्णू तातपुरे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. कल्पना गिराम यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष येंचेवाड, राजाभाऊ बोडके, संतोष राठोड यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE